महाराष्ट्र शासन

# (अधिष्ठाता यांचे कार्यालय)

# सर्वोपचार रुग्णालय, धुळे

## SARVOPCHAR RUGNALAY, DHULE

चक्करबर्डी परीसर, सुरत बायपास रोड, रेसीडेन्सी पार्क हॉटेलसमोर, धुळे

ई मेल: deangmcdhule@gmail.com वेबसाईट: www.sbhgmcdhule.org दुरध्वनी क्र:-०२५६२-२३९४०७/२३९४०८

जा.क्र.सरुघु/आस्था-१/करार पध्दती-जाहिरात/5295/२०२५ दि:- 19 /०६/२०२५

जाहीरात मुसदा मान्यतेस्तव सादर :-

विषय:- चिकित्सालयीन विषयातील सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर नियुक्तीने भरणेबावत.

संदर्भ:-१) महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एलईसी-/२०२१/प्र.क्र.१९९/वैसेवा-३, दि.०९ फेब्रूवारी, २०२२.

२) दि.१०/०८/२०२३ रोजी मा.मंत्री, वै.शि. व वि.स.विभाग महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या सर्व अधिष्ठाता यांच्या बैठकीत मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांनी दिलेल्या सुचने नुसार.

मा.संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथील चिकित्सालयीन विषयातील सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील सहयोगी प्राध्यापक, दंतशास्त्र हे रिक्त पद दैनंदिन रुग्णसेवा, विद्यार्थ्यांचे विविध शैक्षणिक कार्यक्रमाची निकड लक्षात घेता मा.संचालनालयाच्या स्तरावरुन मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरीता इच्छुक पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

इच्छुक पात्र उमेदवारांनी अर्जाचा नमूना अधिष्ठाता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे या संस्थेच्या www.gmcdhule.org या संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घेऊन, अर्ज हे जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते दि. ३०/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) अधिष्ठाता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे या संस्थेत स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करुन अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील. तसेच करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात निवड केलेल्या उमेदवारांची माहिती संस्थेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केली जाईल.

Scanned by CamScanner

# संवर्ग : "सहयोगी प्राध्यापक"

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | दंतशल्यचिकित्सा -शास्त्र | ०१ | M.D.S. | i.As Assistant Professor in the subject ofr four years in a permitted/recognized medical/dental college/institution<br>ii.should have at least two Research publications (only original papers, meta-analysis, systematic reviews, and case series that are published in journals included in medline PubMed, Central Science citation Index, Science Citation Index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Access Journals (DoAJ) will be considered). |

महत्वाची टिप :-

१. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२. उमेदवाराचे वय : नियुक्ती वेळेस दि.२७/०९/२०२३ रोजी कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४. मानधन: (१) सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

(२) खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) यांना खालील नमूदप्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

| अ.क्र. | पद | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १. | सहयोगी प्राध्यापक, दंतशल्यचिकित्सा | चिकित्सालयीन | १,७०,०००/- |

५. सहयोगी प्राध्यापक पदासाठी अर्ज करणा-या अध्यापकांना NMC (राष्ट्रीय वैद्यकीय परिषद) मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयातील किमान ०४ वर्षे सहाय्यक प्राध्यापक पदावरील कामाचा अनुभव असल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. तसेच भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार शोधनिबंध व इतर पात्रता आवश्यक.

६. गुणांकन पध्दत परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

नियम व अटी :-

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील.

२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

Scanned by CamScanner

५. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९. उमेदवारस नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

१०. बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरीक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१३. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठातांना राहतील.

१४. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१७. मुलाखतीला येताना उमेदवारांनी सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

(डॉ सयाजी भामरे)
अधिष्ठाता
सर्वोपचार रुग्णालय, धुळे

Scanned by CamScanner

# ANNEXURE-A

| Sr. No. | Topics | Marks |
|---|---|---|
| 1. | Additional Qualification concerned subject (ph.D.-3 marks Diploma/Fellowship-1 mark for each Diploma/ Fellowship) | 5 |
| 2. | Post Graduate teaching experience in concerned specialty (1 mark for every year) | 10 |
| 3. | Research paper publications as (1 mark for each publication) | 10 |
| 4. | Research projects completed as Principal or co-principal investigator (PI/CoPI) of a research project funded by national research bodies such as Indian Council for Medical research (ICMR), Department of Science and Technology (DST), Department of Bio-Technology (DBT) or any such body or international sponsors (2 marks as PI & 1 mark as Co-PI for each research Project) | 10 |
| 5. | Text Book/Reference Book/University Approved (2 marks for each book as an author) | 10 |
| 6. | For every chapter written in Text Book/Reference Book /University Approved book (1 mark each) | 5 |
| 7. | Administrative participation in initiatives such as admission process /CET/enquiries conducted, etc (1 mark each) | 5 |
| 8. | Conferences (state/national/international level) organized as organizing secretary (1 mark each) | 5 |
| 9. | Training (state/national/international level) organized as organizing secretary (1 mark each) | 5 |
| 10. | Attended as faculty in Training workshops/ CME (state/ national/ international level) (1 mark each) | 5 |
| 11. | Course / fellowship in (FAIMER/FIME/ACME/AETCOM) (1 Mark each) | 10 |
| 12. | Award for Poster/Paper/Any Academic activity (1 mark each) | 10 |
| 13. | Interview | 10 |
| | TOTAL :- | 100 |

(डॉ सयाजी मामरे)
अधिष्ठाता
सर्वोपचार रुग्णालय. घळे

Scanned by CamScanner

अर्ज क्र. --------

# सर्वोपचार रुग्णालय, धुळे

## चिकित्सालयीन सहयोगी प्राध्यापक, दंतशास्त्र या पदासाठी अर्जाचा नमुना

अलिकडिल काळातील पासपोर्ट आकाराचा कलर फोटो चिकटवावा

प्रति,
मा.अधिष्ठाता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पदाचे नाव :- | | | | विषय:- | | | |
| उमेदवाराचे संपूर्ण नाव :- | | | | | | | |
| कायमचा पत्ता:- | | | | | | | |
| भ्रमणध्वनी क्रमांक :- | | पॅन क्रं.:- | | आधार कार्ड क्र.:- | | | |
| जन्म दिनांक | तारीख | महिना | वर्ष | मुलाखतीच्या दिवशीचे वय :- | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| जन्माची (वयाची) पडताळणी करण्यासाठी दहावीच्या प्रमाणपत्राची किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची प्रत जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अर्जदार इतरत्र नोकरीत आहे काय ? | होय | नाही |
| नोकरीत असल्यास तपशिल देवून नियोकत्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत प्रथम, द्वितीय, तृतीय, वर्ष एमबीबीएस पास व नापास दोन्ही गुणपत्रिका जोडाव्यात. | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर परिक्षेचे गुणपत्रिका जोडाव्यात. | होय | नाही |
| अर्जासोबत एम.बी.बी.एस. प्रयत्नांचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत एम.एम.सी.तसेच एम.सी.आय.चे कायम नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| एम.एम.सी. प्रमाणपत्र चालू वर्षात वैध (रिन्युयल) केलेले असावे. | होय | नाही |

| शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण केलेली परिक्षा | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | लागलेले प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| १. | तृतीय वर्ष एमबीबीएस | | | | |
| २. | एम.एस./एम.डी. | | | | |
| ३. | इतर | | | | |

अटी व शर्ती :-

अर्जातील पदावरील अनुभव व अनुभव प्रमाणपत्र नसल्यास अर्ज बाद होईल.

सदरील अर्जातील पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता एन.एम.सी.च्या मानकांनुसार असावी.

सर्व कागदपत्रे फार्म मधील अनुक्रमांनुसार लावणे बंधनकारक राहील.

सादर केलेल्या सर्व कागदपत्रावर स्वत:चे साक्षांकन (Selt Attested) करणे आवश्यक राहील.

कागदपत्रात त्रृटी आढळल्यास अर्ज बाद होईल. (आवश्यक नसलेले प्रमाणपत्र/कागदपत्रे जोडू नयेत)

अर्ज पूर्ण वाचुन पूर्ण भरावा, अपुर्ण अर्ज स्विकारला जाणार नाही.

अर्जदाराची स्वाक्षरी दिनांकासह :-

टिप:- अर्जदाराने अर्जासोबत छायांकित सत्यप्रती जोडलेल्या असाव्यात, अर्जादाराने प्रत्येक पदासाठी/विषयांसाठी स्वतंत्र अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह सादर करावा.

Scanned by CamScanner

अर्ज तपासणी व निवड समितीची स्वाक्षरी :-

सदस्य　　　　सदस्य　　　　सदस्य

सदस्य　　　　सदस्य　　　　सदस्य　　　　सदस्य सचिव

मुलाखतीसाठी पात्र/अपात्र　　　　अध्यक्ष तथा अधिष्ठाता

**स्थानिक निवड मंडळ समिती, सर्वोपचार रुग्णालय, धुळे**

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

# सर्वोपचार रुग्णालय, धुळे

SARVOPCHAR RUGNALAY, DHULE

चक्करबर्डी परीसर, सुरत बायपास रोड, रेसीडेन्सी पार्क हॉटेलसमोर, धुळे

ई मेल: deangmcdhule@gmail.com वेबसाईट: www.sbhgmcdhule.org दुरध्वनी क्र:-०२५६२-२३९४०७/२३९४०८

जा.क्र.सरुधु/आस्था-१/जाहिरात-करार/अध्यापक/चिकित्सालयीन/5296/२०२५ दि:-19/०६/२०२५

प्रति,
मा.संचालक,
माहिती व प्रसिध्दी संचालनालय,
...........................................
...........................................

विषय:- दंतशास्त्र, सहयोगी प्राध्यापक (चिकित्सालयीन) हे पद करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत...

संदर्भ :- मा. संचालनालय, मुंबई यांचे अतिमहत्वाचे पत्र क्र. संवैशिवसंमुं/जाहिरात/करार/क १/२५९३ /२०२३ दि.२५/०८/२०२३.

मा.संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांच्या आस्थापनेवरील सहयोगी प्राध्यापक, दंतशास्त्र (चिकित्सालयीन) हे पद करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत या पत्रासोबत जोडण्यात येत असलेली जाहिरातीची सूचना जास्तीत जास्त खप असलेल्या अग्रगण्य वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयाचे नांव दुरध्वनी व ई-मेल पत्ता | सर्वोपचार रुग्णालय, चक्करबर्डी परीसर, सुरत बायपास रोड, रेसीडेन्सी पार्क हॉटेलसमोर, धुळे- ४२४ ००१<br>दुरध्वनी क्रमांक :- 02562- 239408<br>Email :- deangmcdhule@gmail.com |
| ०२ | जाहिरातीची सूचना प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दि २०/०६/२०२५ ते दि.३०/०६/२०२५ |
| ०३ | प्रसिध्दीचे स्वरुप | राज्यस्तरीय |
| ०४ | प्रसिध्दीकरीता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्र | जास्तीत जास्त खप असलेल्या राज्यस्तरीय अग्रगण्य एक मराठी व एक इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये. |
| ०५ | किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे | एक वेळ |
| ०६ | देयक प्रदान करण्याकरीता कोणत्या नांवाने पाठविण्यात यावे | संस्थेचे नांव :- अधिष्ठाता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे |

सोबत :- जाहिरातीची सूचना

(डॉ. सयाजी भामरे)
अधिष्ठाता
सर्वोपचार रुग्णालय, धुळे

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)
सर्वोपचार रुग्णालय, धुळे
SARVOPCHAR RUGNALAY, DHULE
चक्करबर्डी परीसर, सुरत बायपास रोड, रेसीडेन्सी पार्क हॉटेलसमोर, धुळे
ई मेल: deangmcdhule@gmail.com वेबसाईट: www.sbhgmcdhule.org दुरध्वनी क्र:-०२५६२-२३९४०७/२३९४०८

जा.क्र.सरुघु/आस्था-१/जाहिरात-करार/अध्यापक/चिकित्सालयीन/5297/२०२५ दि:-19/०६/२०२५

## :: जाहिरातीची सूचना ::

मा.संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांच्या आस्थापनेवर वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरिता चिकित्सालयीन दंतशास्त्र विषयातील सहयोगी प्राध्यापक, दंतशास्त्र यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवारांना करार पध्दतीने नियुक्ती देण्यासाठी संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर दि ३०/०६/२०२५ रोजी सविस्तर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

(डॉ सयाजी भामरे)
अधिष्ठाता
सर्वोपचार रुग्णालय, धुळे

Scanned by CamScanner